**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २११/२००७**

**१) श्री रविकांत विठ्ठलराव रागीट,**
**रा. भाग्यश्री कॅालनी, रामटेक,**
**ता. रामटेक, जिल्हा नागपूर.**

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक,**
**ता. रामटेक, जिल्हा नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक,**
**ता. रामटेक, जिल्हा नागपूर.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ११.३.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.८.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमतीने गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत. सदरच्या अपीलाची सुनावणी यापूर्वी दिनांक १२.७.२००७ रोजी ठेवण्यात आली होती, त्यावेळी सुध्दा अपीलकर्ता गैरहजर होते.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२००६ रोजी सन २००५ मध्ये B.Ed central admission committee K.K.S.U. Nagpur & B.Ed admissions in following format एक तक्ता दिलेला आहे व त्या तक्त्यामध्ये By speed post माहिती उपलब्ध करुन द्यावी असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २२.३.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ९.५.२००६ रोजी दिलेला असून खर्चाचा भरणा म्हणून रुपये २३८४/- भरावा असे आदेश दिलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न

झाल्यामुळे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव यांनी सदरच्या प्रकरणात खुलासा दाखल करताना असे निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१.२००६ रोजी बी.एड. या अभ्यासक्रमाला सन २००३-०४, २००४-०५, २००५-०६ या वर्षामध्ये दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती विचारलेली होती. सदरच्या माहिती करीता दिनांक १८.३.२००६ रोजी रुपये ४५००/- चा खर्च भरावा असे कळविण्यात आलेले होते. त्यापुर्वी सुध्दा दिनांक १०.२.२००६ रोजी त्यांना कळविण्यात आलेले होते परंतु खर्चाचा भरणा केलेला नाही व पुन्हा तीच माहिती दिनांक ३.२.२००६ रोजी माहितीच्या अर्जाप्रमाणे मागीतलेली होती व म्हणून पुन्हा त्याबाबत त्या अर्जाच्या संदर्भात त्यांना उत्तर दिले गेले नाही. मात्र दिनांक ९.५.२००६ रोजी सुध्दा रुपये २३८४/- दिनांक ३.२.२००६ च्या अर्जाप्रमाणे भरण्याचे आदेश दिले असता ते आपण भरलेले नाहीत.

विश्वविद्यालय ही स्वायत्त संस्था आहे. त्यामुळे माहिती अर्जाचे शुल्क रुपये १०/- व अपील अर्जाचे शुल्क रुपये २०/- हे विद्यापीठाला मिळणे अपेक्षित आहे. शासकिय स्टॅाम्प लावल्याने हे शुल्क विश्वविद्यालयाला न मिळता शासनाला मिळते ते विद्यापीठाला मिळणे अपेक्षित आहे. त्यामुळे या शुल्काची विद्यापीठाने मागणी केली आहे. विश्वविद्यालयाचा स्वतंत्र अर्जाचा नमूना विश्वविद्यालयाच्या वेब साईटवर उपलब्ध आहे. त्या विहित नमून्यात अर्ज करणे अपेक्षित आहे. व तशा संबंधीत अर्जदारांना वेळोवेळी सूचना करुन अर्जाचा नमूनाही निशुल्क पाठविण्यात आला आहे.

श्री रविकांत रागीट हे दमयंतीताई देशमुख बी.एड कॉलेज यांच्या लोकल बॅाडीचे अध्यक्ष असून दृष्टी बहुउद्येशिय शिक्षण संस्थेचेही अध्यक्ष आहेत. यांची दोन महाविद्यालये विश्वविद्यालयाला संलग्नीत आहेत. या महाविद्यालयात मान्यताप्राप्त प्राचार्य व मान्यताप्राप्त शिक्षक नाहीत. या दोनही महाविद्यालयाचा दैनंदिन पत्रव्यवहार अध्यक्ष श्री रविकांत रागीट यांच्या सहिने होतो ही गंभीर अनियमितता आहे. प्राचार्य व अध्यापक नसल्यामुळे कारवाईच्या भीतीने विश्वविद्यालयाला गुंतवून ठेवण्यासाठी थोडया कालावधीत २५ पेक्षा जास्त अर्ज

विद्यापीठाला सादर केले व माहिती मागण्याचा सपाटा लावला. स्वतःच्याही महाविद्यालयाची माहिती विश्वविद्यालयाकडून मागण्यात त्यांचा माहिती मागण्यामागचा उद्येश स्पष्ट आहे.

विश्वविद्यालयाच्या बी.एड. केंन्द्रिय प्रवेश समितीत त्यांच्या महाविद्यालयाचे प्रतिनिधी अधिकृतपणे समाविष्ट आहेत. गेल्या तीन वर्षापासून बी.एड. केन्द्रिय समितीतर्फेच प्रवेश होत आहेत त्यात यांच्याही महाविद्यालयाचे प्रवेश होतात. सुरुवातीपासूनच संस्था अध्यक्षांच्या आदेशानेच त्यांच्या महाविद्यालयाचे कर्मचारी प्रवेश समितीत सहभागी होतात. त्यामुळे श्री रागीट यांचेजवळ केन्द्रिय समितीबध्दल पूर्ण माहिती उपलब्ध आहे. असे असतानाही त्यांनी विश्वविद्यालयाकडून या माहितीच्या कायद्या अंतर्गत माहिती मागितली हा या कायद्याचा दुरुपयोग आहे. कायद्यातील नियमानुसार विश्वविद्यालयाने त्यांना संपूर्ण माहिती देण्याची तयारी दाखविली व २००५ च्या माहिती कायद्यात दिलेल्या शासकिय तरतुदीनुसार रुपये २३८४/- शुल्क जमा करण्यास पत्र पाठविले. परंतु त्यांनी पैसे भरलेले नाहीत. यावरुन ते माहिती जाणण्यात उत्सुक नसून विश्वविद्यालयातील कर्मचा-यांना गुंतवून ठेवून त्रास देण्यासाठी ही माहिती विचारित आहेत हे उघड आहे.

महत्वाचे :- या विश्वविद्यालयाला चतुर्थ श्रेणी ते कुलगुरु अशा केवळ २५ कर्मचा-यांच्या भरवशावर संपूर्ण महाराष्ट्र कार्यक्षेत्रात ५४ अभ्यासक्रमांचे सुमारे ७० परीक्षांचे संचलन करावे लागते. प्रत्येक कर्मचा-यावर दोन अतिरिक्त कार्यभार आहेत आणि त्यातच महितीच्या अधिकाराचा अतिरिक्त भार पडल्याने विश्वविद्यालयाच्या नैसर्गिक उद्यीष्टपूर्तीच्या कामांची गळचेपी हात आहे. आणि त्यामुळे माहिती देण्यात त्रुटी राहू नये याची दखल घेता घेता थोडा विलंब होणे साहजीकच आहे. या विश्वविद्यालयाच्या अडचणींची आयोगाने कृपया दखल घ्यावी, असा खुलासा केलेला आहे.

४. वरील खुलाशा वरुन जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव यांचे वकील श्री आर.बी. हिंगणेकर यांच्या युक्तीवादावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता हे ज्या संस्थेचे अध्यक्ष आहे ती संस्था ब-याच वर्षापासून कार्यरत आहे व स्वतः बी.एड च्या अभ्यासक्रमा करीता विद्यार्थी दाखल करुन घेतात व बी.एड केंद्रिय समिती तर्फेच प्रवेश होत आहे. त्यांच्याही महाविद्यालयात प्रवेश होतात व सुरुवातीपासून बी.एड. केन्द्रिय समितीतर्फेच प्रवेश होत आहेत त्यात त्यांच्याही

महाविद्यालयाचे प्रवेश होतात. सुरुवातीपासूनच संसथा अध्यक्षांच्या आदेशानेच त्यांच्या महाविद्यालयाचे कर्मचारी प्रवेश समितीत सहभागी होतात. त्यामुळे श्री रागीट यांचेजवळ केन्द्रिय समितीबध्दल संपूर्ण माहिती उपलब्ध असतानाही त्यांनी विश्वविद्यालयाकडून या माहितीच्या कायद्या अंतर्गत माहिती मागीतली हे या कायद्याच्या तरतूदींचे उल्लंघन आहे हे म्हणणे संयुक्तिक दिसून येते. अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे माहिती विचारण्याचे कारण जरी विचारता येत नसले तरी आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, खुलाशावरुन व युक्तीवादावरुन हेतूचा विचार करणे आवश्यक असते. व त्याबाबतही जन माहिती अधिकारी व कुलसचिव यांचे म्हणणे हे योग्य दिसते. तसेच एका अर्जाच्या माध्यमातून माहिती मागणे त्याचा त्या माहिती करीता खर्च भरणा न करणे, पुन्हा तीच माहिती दूस-या अर्जाच्या माध्यमातून मागणे व त्याहीकरीता खर्च न भरणे यावरुन अपीलकर्ता हे विद्यापीठास वेठीस धरण्याकरीता माहिती मागताना दिसून येतात हा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. असे असले तरी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली दिसून येत नाही किंवा नकार दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे खर्चाचा भरणा केलेला नसल्यामुळे सदरची माहिती ही खर्चचा भरणा केल्यावर उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.३.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर.**